तात्काळ/महत्त्वाचे
कालमर्यादा

प्रति

अध्यक्ष/सचिव,
पोदार चॅरिटी ट्रस्ट, मुंबई

मा.क.शिपरा/प्राथ-२०२/स्वयं अशाळा/मान्यता/पुणे/२०१९-२०/

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे २ यांचे कार्यालय,
दिनांक:-

- 9 JAN 2020

विषय - सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व नियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा वर्ग वाढ करण्यासाठी परवानगी (इयत्तावार) बाबतबाबत...

संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व नियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. २,१ व २४) २०१२

२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र साप्र-२००९/(१९३/०९)/प्राशि-१ दिनांक २८ जून २०१२

३. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र एसआयएस-१०१८/प्र क्र १५८९/प्रशाल-२ दिनांक २३ जुलै २०१९

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने स्वयंअर्थसहाय्यित महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व नियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत प्रस्तावित [illegible]

संदर्भ नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता परवानगी मिळणेबाबत आपल्या संस्थेने सादर केलेला प्रस्ताव [illegible]

नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीस परवानगी देण्यात आली आहे

शासन पत्रानुसार अ.क्र.	जिल्हा	अर्जदार संस्थेचे नाव	मान्यता दिलेल्या शाळेचे नाव व पत्ता	माध्यम	शाळेचा प्रकार नवीन शाळा/वर्गवाढ व मंडळ संलग्नता	मान्यता वर्ग/इयत्ता	मान्यतावर्ष
१	२	३	४	५	६	७	८
१	पुणे	पोदार चॅरिटी ट्रस्ट, मुंबई	पोदार इंटरनॅशनल स्कूल, गट नं १३७ ते १४५, खराबवाडी, ता. खेड, जि. पुणे	इंगजी	नवीन शाळा (सी.बी.एस.ई.) (स्वयंअर्थसहाय्यित शाळा)	प्राथमिक व उच्च प्राथमिक (इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी) सर्व शाखा	२०१८-१९

अटी व शर्ती :-

१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व वेळोवेळी सुधारित नियम सर्व निकषांची पूर्तता करणे आवश्यक आहे

२ पत्र दिलेल्या संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पूर्तता करुन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्याचा प्रस्ताव सादर देण्यात येत आहे :

३ ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिका-यांकडे अर्ज करायेत

४ ज्या व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करण बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल

५ सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाच्या पात्र ठरवून-परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता प्राप्तसह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जांची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना हरकत (N.O.C) प्रमाणपत्र देईल

६ परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यान्वितीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व नियमन) मुल्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील

७ संबंधित सक्षम अधिका-यानी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पूर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी

८ मान्यता शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात यईल

९ यु-डायस डाटा- या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळाबाबत जिल्हास्तरावर U-DISE (Unified District Information System For Education) बाबत माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र अस्तित्व [illegible] करुन कमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प [illegible] मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे त्याप्रमाणे संस्थेने, सदर संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील

शिक्षण उपसंचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय
- 9 JAN 2020
जावक क्र

Ms.Archana Pratap Karande
Principal
Podar International School,
Sara City Chakan,Pune
Affiliation No. 1131217
Udise No. 27250810206

(अनुराधा ओक)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,
१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे/अहमदनगर /सोलापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर
१. मा.अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२
२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.